महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.
क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालयासमोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
: सीईटीसेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
ईमेलः maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईटः www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/नीटयुजी-२०१७/नोटीस क्र.२८/१२१५ दिनांकः- २५.११.२०१७.

# NEET UG - 2017
# NOTICE
## ( Only for CandidatesRegistered on DMER website )

**शासकीय, शासनअनुदानीत व खाजगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम रिक्त जागांवरील प्रवेशाकरिता "महाविद्यालय स्तरावरील** (Institutional level) **प्रवेश प्रक्रीया"** (Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions Rule, २०१६ मधील Rule No.१६

---

आयुष मंत्रालय, केंद्रसरकार, नवी दिल्ली यांचे पत्र संदर्भ क्रमांक संख्या/F.No.R.11011/04/2016-EP(IM-1),दिनांक२४/११/२०१७ अन्वये उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक२९/११/२०१७ पर्यंत वाढविलेला आहे. सदरहू पत्राचे अटीप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या मान्यतेच्या अधीन राहून सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.सदर प्रवेश प्रक्रीया खालील दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येत आहे-

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १) | *रिक्त जागांचा तपशील वेबसाईट वर (www.dmer.org) वर टाकण्यात येईल. | दि.२५.११.२०१७ |
| २) | उमेदवारांनी रिक्त जागांचा तपशील क्रमांक ०१ प्रमाणे पाहून त्यांच्या निवडीप्रमाणे व्यक्तीशः किंवा त्यांचे पालकांनी को-या कागदावर अथवा संबंधित महाविद्यालयाच्या ईमेलवर अर्ज सर्व आवश्यक प्रमाणपत्रासह संबंधित महाविद्यालया कडे सादर करावा. | दि.२७.११.२०१७ ते दि.२८.११.२०१७ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३) | महाविद्यालयाने प्राप्त अर्जातून( ऑनलाईन व ऑफलाईनअर्जातून ) गुणवत्ता यादी नोटीस बोर्डावर व महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची वेळ | दि.२८.११.२०१७ रोजी रात्री ०९.०० वाजेपर्यंत |
| ४) | महाविद्यालयाने गुणवत्तेनुसार उमेदवार प्रवेश देण्याची प्रक्रिया (जे उमेदवार NEET UG- 2017 या ब्रोशर मध्ये नमूद सर्व मुळ प्रमाणपत्र जमा करतील फक्त त्यांनाच महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश घेता येईल) | दि.२९.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. ते मेरिटप्रमाणे प्रवेश संपेपर्यंत |
| ५) | महाविद्यालया ने प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील, आयुष संचालनालयात ई-मेलद्वारे directorayurvedmaha@gmail.com सादरकरणे. | दि.२९.११.२०१७ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत |

उमेदवारांनी महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता आवश्यक मुळ प्रमाणपत्रे **NEET UG - 2017** माहितीपुस्तिका (**Brochure**) मध्ये नमूद केल्या नुसार व महाविदयालय सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

**उमेदवारांसाठी अतिमहत्वाच्या सूचना**

१) ज्या उमेदवारांनी **NEET UG - 2017** ही परीक्षा दिलेली आहे, तसेच ज्यानी www.dmer.org या संकेतस्थळावर नोंदणी केलेली आहे व **NEET UG - 2017** ब्रोशर मध्ये नमूद केलेल्या पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत असतील असे उमेदवार या महाविद्यालय स्तरावरील प्रवेश फेरीच्या प्रक्रीयेसाठी अर्ज सादर करु शकतील.

*२) दिनांक २५.११.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या महाविद्यालय निहाय उपलब्ध असणाऱ्या रिक्त जागा तसेच त्यानंतरही (ज्या महाविद्यालयामध्ये अर्ज मागविण्यात आले आहेत त्याच महाविद्यालयामध्ये) नव्याने रिक्त झालेल्या जागा याच फेरीमध्ये महाविद्यालयांना प्राप्त झालेल्या अर्जामधुनच भरण्यांत येतील.

३) ज्या उमेदवारांना या पूर्वीच्या प्रवेशफेरी मध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळाला असेल व उमेदवार संबंधित महाविद्यालयात दि.२५.११.२०१७ रोजी रुजू असतील असे उमेदवार या प्रवेश फेरीस अपात्र असतील म्हणजेच अशा उमेदवारांना सदर महाविद्यालय स्तरावरील प्रवेशफेरीसाठी अर्ज करता येणार नाही.

४) यापूर्वी वैयक्तिकसमुपदेशन (केंद्रीय/ संस्थास्तरावर) किंवा ऑनलाईन प्रवेशफेरी मध्ये राज्य सीईटी कक्षामार्फत इंटरसे राऊंड पूर्ण झालेला असल्यामुळे महाविद्यालयात कोणतीही नवीन जागा उपलब्ध न झाल्यामुळे सर्व रिक्त जागा खुल्या (Open) प्रवर्गातून उपलब्ध राहातील व संबंधित महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाच्या गुणानुक्रमानुसार भरल्या जातील.

५) ज्या उमेदवारांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे तेथे दि.२९.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केलेली सर्व मुळप्रमाणपत्रे व शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला यासह संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहाणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी (सकाळी १०.०० वाजता उपस्थित विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेप्रमाणे प्रवेश दिले जातील याची नोंद घ्यावी).

६) या प्रवेशफेरीत निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क धनाकर्ष / धनादेश किंवा रोखीने त्वरित अदा करुन आपला प्रवेश कायम करावा.

७) उमेदवारांनी आपल्या संबंधित महाविद्यालयातील गुणवत्ता यादीतील क्रमांक व महाविद्यालया मध्ये उपलब्ध जागा यांचा तपशील बघूनच संबंधित महाविद्यालयात प्रवेशाकरीताउपस्थित रहावे.

८) उमेदवारांना कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी maharashtra.cetcell@gmail.com या ई-मेलवर किंवा ०२२-२२६५२२५९ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

९) महाविद्यालयाने/संस्थेने उमेदवाराकडे देणगी अथवा अतिरिक्त फीची मागणी केल्यास, उमेदवाराने नजिकच्या पोलीस स्टेशनमध्य FIR नोंदवून त्याची प्रत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास सादर करण्यात यावी.

१०) मा.आयुक्त व सक्षम प्राधिकारी राज्य सीईटीसेल, यांनी निरिक्षकांची नेमणूक केली आहे. उमेदवाराची प्रवेशाबाबत काही तक्रार असल्यास ती निरीक्षकांना द्यावी. त्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

सही /-
(राजीव निवतकर) भा.प्र.से.
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,
राज्य सीईटी कक्ष, महाराष्ट्र राज्य